स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.
दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/भांडार/3036 दिनांक - 27 JAN 2023

परीक्षा प्राधान्य/महत्वाचे

प्रति,
केंद्र संचालक /प्राचार्य/मुख्याध्यापक,
उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२३
सातारा/सांगली/कोल्हापूर.

विषय :-उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२३ या परीक्षेच्या उत्तरपत्रिका, पुरवण्या, नकाशा, होलोक्राफ्ट स्टिकर्स वापरण्याबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, फेब्रु/मार्च २०२३ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी लागणा-या उत्तरपत्रिका, पुरवण्या, नकाशा, होलोक्राफ्ट स्टीकर्स इत्यादी साहित्य हस्तपोहोच पाठविण्यात येत आहे.त्याचा तपशील खालील प्रमाणे

**** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी ) ****

१. **२८ पानी बारकोड असलेल्या उत्तरपत्रिका**
सदरच्या २८ पानी बारकोड असलेल्या उत्तरपत्रिका सर्व माध्यमांच्या विषयांना विद्यार्थ्यांना द्यावयाच्या आहेत. सदर उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना देण्या अगोदर आतील पाने कमी जास्त, मळकट, अपूरी सुटलेली फाटलेली, शिलाई निघालेल्या व क्रमवार नसलेली पानांची उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना दिली जाणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.सर्व माध्यमांची विद्यार्थी संख्या विचारात घेऊन पुरवठा करण्यात आलेला आहे.

२. **४ पानी बारकोड असलेल्या पुरवणी**
सर्व माध्यमाच्या सर्व विषयांच्या विद्यार्थ्यांना ४ पानी पुरवण्यांचा आवश्यकतेनुसार पुरवठा करण्यात यावा.

३. **०४ पानी नकाशा बारकोड असलेल्या पुरवणी**
सदरची नकाशा पुरवणी भूगोल विषयासाठी विद्यार्थ्यांना द्यावयाची आहे.प्रत्येक विद्यार्थ्यांस एक या प्रमाणे सदर पुरवणीचा पुरवठा करण्यात आलेला आहे.सन २०२३ मध्ये परीक्षेसाठी सुधारित स्वरुपाचा छपाईकरुन पुरवठा करण्यात येणा-या नकाशा पुरवणीचा वापर करावा. शिल्लक नकाशा पुरवणीचा वापर करु नये.

४. **काळे होलोक्राफ्ट स्टिकर्स (HOLOCAFT STICKERS)**
उत्तरपत्रिका, पुरवण्या, नकाशे इत्यादीवर होलोक्राफ्ट स्टिकर्स चिकटवताना ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक, केंद्र क्रमांक इत्यादी माहिती आहे अशा ठिकाणी न चुकता होलोक्राफ्ट स्टिकर्स चिकटवण्यात यावा, जेणे करुन गोपनीयतेचा भंग होणार नाही. तशा सूचना पर्यवेक्षकांनाही देण्यात याव्यात.

P.T.O.

वरील साहित्य ताब्यात मिळताच साहित्याची त्वरित मोजदाद करुन घ्यावी. साहित्याची मोजदाद करुन न घेतल्याने नकाशा, पुरवण्या उत्तरपत्रिका इत्यादी साहित्य पेपरच्या दिवशी फोनवरुन मागणी केली जाते व त्यामुळे कार्यालयाची अडचण होते. तरी याबाबत आपण स्वत: सर्व साहित्य ताब्यात मिळताच त्वरित मोजून घ्यावे. कमी पडत असल्यास साहित्य तात्काळ आपल्या प्रतिनिधी मार्फत मागवून घ्यावे. उत्तरपत्रिकेवर पृष्ठ क्रमांक चुकले असतील किंवा खराब, फाटलेल्या व उत्तरपत्रिका शिलाई निघालेल्या असतील तर त्या वेगळ्या ठेवाव्यात त्याचा वापर करु नये.

## (महत्वाची सूचना)

२८ पानी बारकोड असलेल्या उत्तरपत्रिका,नकाशे,पुरवण्या इत्यादी मोठ्या प्रमाणात छपाई करुन घ्यावी लागते. त्यामुळे उत्तरपत्रिकांमध्ये पानांची संख्या कमी अगर जास्त असणे,छपाई अस्पष्ट,शिलाई व्यवस्थित नसलेल्या,मळकट अशा उत्तरपत्रिकांचा पुरवठा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अशा प्रकारच्या उत्तरपत्रिका,पुरवण्या व नकाशा पुरवणी विद्यार्थ्यांना देण्यापूर्वी उत्तरपत्रिकांची तपासणी करुन चांगल्या स्थितीत असलेल्या उत्तरपत्रिका,पुरवण्या,आलेख व नकाशा पुरवण्यांचा विद्यार्थ्यांना पुरवठा करण्यात यावा.जेणेकरुन विद्यार्थ्यांची अडचण होणार नाही.तसेच शिक्के मारण्यात आलेल्या व लिहिलेल्या उत्तरपत्रिका,पुरवण्या कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांला दिली जाणार नाही,याबाबत दक्षता घेणेबाबत संबंधित स्टेशनरी सुपरवायझर,ब्लॉक सुपरवाझर यांना सूचना देण्यात याव्यात.

वरील प्रमाणे २८ पानी उत्तरपत्रिका,पुरवण्या व होलोक्राफ्ट स्टिकर्स पाठविण्यात येत असून ते सुयोग्यरित्या वितरित करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपणांवर राहील,यापैकी काही साहित्य कमी पडल्यास नजीकच्या संबंधित परिरक्षक यांचे कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावे,याची नोंद घ्यावी.

सदर सूचनांप्रमाणेच साहित्य (उत्तरपत्रिका,पुरवण्या,नकाशे इ.) वापरावयाचे आहे.आपल्या केंद्रावर जर यापूर्वीच्या परीक्षेचे साहित्य शिल्लक असेल तर ते कोणत्याही परिस्थितीत वापरु नये. तसे आढळल्यास त्याबाबत आपणांस जबाबदार धरण्यात येईल,याची गांर्भीयाने नोंद घ्यावी.

(डी.एस.पोवार)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

**टिप:१) परीक्षा संपताच शिल्लक असणारे सर्व साहित्य (उदा.उत्तरपत्रिका,पुरवणी व नकाशे इ.) व्यवस्थितरित्या गठ्ठे बांधून आपल्या संबंधित परिरक्षक कार्यालयात यादीसह जमा करावे व जमा केलेल्या शिल्लक साहित्याचा अहवाल मंडळास ०८ दिवसात न चुकता पाठवावा.**

**२) परीक्षेसाठी देण्यात आलेले लॉग टेबल परीक्षा झाल्यानंतर पुढील परीक्षांसाठी आपणाकडेच सुस्थितीत जतन करुन ठेवण्यात यावेत. या पूर्वीच्या जुन्या लॉगटेबलचा वापर करू नये.**

प्रत महितीस्तव: सर्व परिरक्षक - सातारा/सांगली/कोल्हापूर जिल्हे

यांनी केंद्रसंचालकांना काही कारणाने स्टेशनरी कमी पडत असल्यास मंडळाकडून आपल्या परिरक्षक कार्यालयास पुरविण्यात आलेल्या स्टेशनरीमधून आवश्यकतेप्रमाणे पुरविण्यात याव्यात व त्याचा हिशेब मंडळास सादर करावा.